## पोलीस अधीक्षक, जळगांव
## पोलीस शिपाई भरती -२०१९ उमेदवारांना सूचना

१. जळगांव जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील १२८ पोलीस शिपाई पदांसाठीची लेखी परीक्षा ०९/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरु होणार आहे. त्यामुळे पोलीस शिपाई या पदाकरिता आवेदन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर सकाळी ०९.३० वाजता मुख्य प्रवेशद्वारावर हजर रहावे. तसेच परीक्षा हॉल मध्ये १०.१५ वाजता उपस्थित राहणे आवश्यक आहे.

२. उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

३. उमेदवारांची आवेदन अर्ज भरतेवेळी दिलेला फोटो घेऊन यावे. प्रवेशपत्राशिवाय प्रवेश दिला जाणार नही तसेच उमेदवारांनी परीक्षाकरीता काळा बॉलपेन घेऊन यावे. परीक्षा केंद्रावर आलेल्या उमेदवारांनी पर्यवेक्षकांच्या समोर प्रवेशपत्रावर स्वाक्षरी करावी.

४. उमेदवारांनी शासनाने जारी केलेले आधार कार्ड/पॅनकार्ड/मतदान कार्ड/महाविद्यालयीन प्रवेशपत्र/ड्रायव्हींग लायसन्स यापैकी कोणतेही एक मुळ आणि वैध ओळखपत्र लेखी परीक्षेकरीता सोबत आणावे.

५. उमेदवार यांनी कोव्हीड-१९ चे अनुषंगाने शासनाने घालुन दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. सॅनिटायझर, मास्कचा वापर करावा व सुरक्षित अंतर ठेवावे.

६. उमेदवारांना परीक्षा केंद्रावर त्यांचा मोबाईल घेऊन प्रवेश दिला जाणार नाही. तसेच पायात बुट, व पायमोजे घालुन व पाण्याची बाटली घेऊनही प्रवेश देण्यात येणार नाही. उमेदवारांनी प्रवेश केंद्रामध्ये प्रवेश करण्यापूर्वी आपलेसोबत अनावश्यक वस्तु आणू नये आणल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवारांची राहील.

७. उमेदवारांनी लेखी परीक्षा चाचणीस गैरहजर राहिला तर पुन्हा लेखी परीक्षा चाचणी घेण्याबाबत कोणतेही स्वतंत्र संधी किंवा पुढील तारीख देण्यात येणार नाही त्यास संपूर्ण भरती प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल.

८. उमेदवारांनी लेखी परीक्षा चाचणीस गैरहजर राहिला तर पुन्हा लेखी परीक्षा चाचणी घेण्याबाबत कोणतेही स्वतंत्र संधी किंवा पुढील तारीख देण्यात येणार नाही त्यास संपूर्ण भरती प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल.

९. उमेदवारांनी पोलीस भरती प्रक्रियेमध्ये उद्धटवर्तन/गैरवर्तन केल्यास त्यांना कोणत्याही क्षणी भरती प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल.

१०. उमेदवारांनी पोलीस भरती प्रक्रियेमध्ये नियमबाह्य दबाव, वशिलेबाजी तसेच भ्रष्ट आचरण व वर्तवणूक करणा-यास अपात्र घोषित करण्यात येईल.

११. पोलीस भरती प्रक्रियेमध्ये उमेदवारास कोणतीही शारिरीक इजा/नुकसान झाल्यास त्यास सर्वस्वी जबाबदार स्वत: उमेदवार राहिल.

१२. जळगांव घटकात पोलीस शिपाई भरती प्रक्रिया ही तटस्थपणे, नि/पक्षपातीपणे व पारदर्शक होणार असुन दक्षता अधिकारी म्हणून

१३. उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे/प्रमाणपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या पोलीस भरती प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल.

१४. उमेदवार अगर त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही एंजट/दलाल/अधिकारी/कर्मचारी यांच्या भूलथापांना अमिषाला बळी पडू नये, यामध्ये कोणाचा वशिला ओळखीचा उपयोग केला जाणार नाही उमेदवारांची निवड ही सर्व निकष गुणवत्तेच्या पात्रतेवर होईल.

१५. उमेदवारांनी या कार्यालयांकडून दिलेल्या जाहिरातीमधील सर्व सुचनांची नोंद घ्यावी व त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१६. पोलीस भरती दरम्यान काही अपरीहार्य कारणास्तव संबधित परीक्षा/चाचण्या अगर इतर कोणत्याही बाबतीत बदल करावयाचे झाल्यास ते अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखून ठेवण्यात येत आहेत याची नोंद घ्यावी.

* **पोलीस भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने उमेदवार अथवा उमेदवार नसलेल्या व्यक्तींनी केलेल्या पुढील कृतींना गैरप्रकार/ गैरकृत्य समजण्यात येईल.**

०१. अर्जात हेतुपुरस्कर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा दाखल्याच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडा-खोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट अथवा विहीत पद्धतीने वितरीत न करण्यात आलेले दाखले/कागदपत्रे सादर करणे.

०२. परीक्षेसंबधी या घटकाच्या मालकीचा कोणताही दस्ताऐवज उदा. उत्तरपत्रिका, परीक्षेच्या कालावधीमध्ये प्रश्नपुस्तीका, हजेरीपट उमेदवारांची ओळखपत्रे फाडणे, फेकूण देणे,सोबत घेऊन जाणे किंवा इतर अनधिकृत त्रयस्थ व्यक्तीकडे हस्तांतरीत करणे.

०३. परीक्षेकरीता नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यास उदा. समवेक्षक,पर्यवेक्षक,लिपीक परीक्षा केंद्रप्रमुख सेवापुरवठादार संस्थेचे कर्मचारी, सुरक्षा रक्षक इत्यादींना त्रस्त करणे, धमकावणे अथवा शारीरीक इजा करणे अथवा तसा प्रयत्न करणे.

०४. निवड प्रक्रियेशी संबधित ठिकाणे उदा. परीक्षा कक्ष, शारीरीक चाचणीचे ठिकाण अथवा परीसरात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करणे, घोषणाबाजी करणे इतर उमेदवारांना धमकावणे इत्यादप्रकारचे गैरवर्तन करणे

०५. निवड प्रक्रियेशी संबधित ठिकाणी उदा.परीक्षा कक्ष शारीरीक चाचणीचे ठिकाणी व कार्यालय इत्यादी ठिकाणी घातक अथवा ज्वलनशिल पदार्थासह प्रवेश करणे.

०६. निवड प्रक्रियेशी संबधित ठिकाणी उदा.परीक्षा कक्ष शारीरीक चाचणीचे ठिकाणी व कार्यालय इत्यादी निषिद्ध केलेल्या ठिकाणी स्मार्ट वॉच,डिजीटल वॉच मायक्रोफोन,मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लु टूथ, दूरसंचार साधने म्हणुन वापरण्यायोग्य कोणतीही वस्तु इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वह्या नोट्स परवानगी नसलेली पुस्तके बॅग्ज, लेखन पॅड पाऊच, परिगणक इत्यादी साधने/साहित्य आणणे अथवा स्वत:जवळ बाळगणे अथवा त्याचा वापर करणे आणि त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेणे.

०७. निवड प्रक्रियेशी संबधित ठिकाणे उदा. परीक्षा कक्ष, शारीरीक चाचणीचे ठिकाण व मुख्य कार्यालय इत्यादी ठिकाणच्या पायाभूत सुविधा/ सामग्री यांची कोणत्याही प्रकारची नासधुस करणे अथवा विद्रुप करण्याचा प्रयत्न करणे.

०८. स्वत:च्या उमेदवारीच्या अनुषंगाने स्वत: अथवा व्यक्तीकडून अवैध मार्गाने निवड प्रक्रियेवर प्रभाव टाकणे अथवा प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे

०९. निवड प्रक्रियेसंदर्भात कोणत्याही महत्वाच्या कागदपत्रांवर अश्लील अथवा अन्य आक्षेपार्ह लिखाण करणे चित्र आकृत्या रेखाटणे

१०. परीक्षेच्या उत्तरपत्रिकेवरील सूचनांचे उल्लघंण करुन उत्तरपुस्तीकेशी छेडछाड करणे आणि उत्तरपुस्तिका यावर धमकावणारे लिखाण करणे आणि स्वत:ची ओळख दर्शविणारी कोणतीही चिन्हे लिहणे किंवा उत्तरपुस्तकेत कोणताही असा मजकूर लिहणे, जो भरती प्रक्रियेतील उमेदवारांची ओळख दर्शविण्यास मदत करेल.

११. तोतयोगिरी करणे अथवा करण्याचा प्रयत्न करणे आणि कोणत्याही तोतया व्यक्तीची मदत घेणे.

१२. अवैध मार्गाने प्रश्नपत्रिका मिळविणे अथवा मिळविण्याचा प्रयत्न करणे प्रश्नप्रत्रिका फोडणे अथवा फोडण्याचा प्रयत्न करणे बनावट प्रश्नप्रत्रिकांची विक्री करणे अथवा परीक्षेत अनधिकृत साहित्याद्वारे नक्कल करणे अथवा तत्सम गैरप्रकारचा प्रयत्न करणे.

१३. एखाद्या विशिष्ट निर्णयासाठी संघटितपणे अथवा असंघटितपणे कोणत्याही माध्यमातून भरती प्रक्रियेत दबाव आणणे अथवा दबावाचा प्रयत्न करणे.

१४. अर्जामधील दावा/माहिती आणि निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर सादर केलेल्या कागदपत्रांमधील दावा यामधील फरक तफावत आढळून येणे

१५. कार्यालयाशी पत्रव्यवहार करतांना हेतुपुरस्कर वस्तुस्थितीदर्शक माहिती नमुद न करणे, वस्तुस्थिती दडविणे,पुराव्याविना माहिती देणे पत्रव्यवहारामध्ये खोटे दिशाभूल करणारे आरोप करणे.

१६. अर्जाद्वारे कार्यालयाकडे केलेला दावा अथवा सादर केलेली कोणतीही कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे निवडीच्या अथवा निवडीनंतरच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव खोटी, बनावट, खाडा-खोड केलेली अवैध संबधित शासन आदेश/नियमानुसार जारी न केलेली अथवा सक्षम प्राधिका-याने प्रदान केली नसल्याचे आढळूण येणे.

१७. भरती अध्यक्ष किंवा भरती परीक्षक इत्यादी यांना उमेदवाराने अथवा उमेदवाराच्या वतीने कोणत्याही व्यक्तीने उमेदवाराच्या निवडीच्या अनुषंगाने दबाव आणण्याचा प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे.

१८. भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने मुद्रीत,इलेक्ट्रॉनिक डिजीटल आणि समाज माध्यमाद्वारे भरतीप्रक्रियेवर चुकीचे आरोप करणे, की ज्यामध्ये भरती अध्यक्ष किंवा भरती प्रक्रियेतील सदस्य किंवा भरती प्रक्रियेस सहाय्य करणारे तज्ञ किंवा परीक्षक किंवा अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुद्ध निदर्शने,घोषणाबाजीद्वारे धाकदपटशा दाखविणे यांचा सामावेश आहे.

**गैरप्रकार प्रकरणी कारवाई:-**

**०१. ज्या घटकाकडून राबविण्यात येणा-या परीक्षेत अथवा परीक्षनंतरही कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार किंवा गैरप्रकारचा प्रयत्न करणा-या उमेदवारांवर तसेच उमेदवार नसलेल्या परंतु गैरप्रकार करण्यास सहाय्यभूत ठरणा-या व्यक्तींवर प्रचलित कायदा व नियमानुसार फौजदारी अभियोग दाखल करुन कारवाई करण्यात येईल.**

**०२. उपरोक्त कृत्यापैकी प्रकरणपरत्वे एक किंवा अन्य कृत्य करणे किंवा करण्यास प्रयत्न करणे किंवा करण्यास अपप्रेरणा देणे याकरिता संबधित कायद्यानुसार फौजदारी अभियोग दाखल करण्यासह पुढील प्रमाणे कारवाई करण्यात येईल.**

**अ संबधित निवडप्रक्रियेस अनर्ह ठरविणे**

**ब या घटकाच्या मार्फतीने आयोजित सर्व परीक्षा अथवा निवड प्रक्रियांकरीता कायमस्वरुपी किंवा ठराविक कालावधीकरीता प्रतिरोधीत करणे**

**क गैरप्रकारच्या अथवा गैरप्रकाराच्या प्रयत्नांच्या आधारे शासकीय नोकरी मिळविलेल्या उमेदवार/व्यक्तींची शिफारस रद्द करणे व त्यानुसार संबधित विभाग/कार्यालयाकडून सेवा समाप्तीची कार्यवाही.**

**ड उमेदवार शासकीय नोकरीत असल्यास उचित नियमांतर्गत शिस्तभंगविषयक कारवाई.**

उमेदवार यांना भरती संदर्भात काही तक्रार असल्यास खालील अधिकारी/कार्यालय यांना दुरध्वनी व फॅक्सद्वारे संपर्क साधू शकतील.

| अ.क्र. | अधिका-याचे नाव व हुद्दा | दुरध्वनी क्रमांक | फॅक्स क्रमांक |
|---|---|---|---|
| ०१. | डॉ. प्रविण मुंढे<br>पोलीस अधीक्षक,जळगांव | ०२५७-२२२०४११ | ०२५७-२२२०५११ |
| ०२ | डॉ.बी.जी.शेखरपाटील<br>पोलीस उपमहानिरीक्षक, नाशिक | ०२५३-२५९४१०० | ०२५३-२९७०७११ |
| ०३ | पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक | ०२५३-२५७८२३० | ०२५३-२५७५६२८ |
| ०४ | पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नियंत्रण कक्ष अधिकारी | ०२२-२२०२६६३६ | ०२२-२२०२६५६६ |

5/10/21

**(डॉ. प्रविण मुंढे)**
**पोलीस अधीक्षक, जळगांव**